दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक ११२ वा शुक्रवार दि.१५ सप्टेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## राज्यातील १९४ तालुक्यांत कमी पाऊस, दुष्काळ जाहीर करा

मुंबई (प्रतिनिधी) : राज्यात यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस पडल्यामुळे पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम विदर्भ आणि मराठवाड्यात पिके करपली आ-हेत. काही जिल्ह्यांमध्ये दुबार पेरणी करण्याची वेळ आली असून शेतकरी हवालदील झाला आहे. कर्नाटक सरकारने १९५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला आहे मग केंद्रात व राज्यात तुमचे ट्रिपल इंजिन सरकार असूनही दुष्काळ जाहीर करून शेतक-यांना मदतीचा हात देण्याची धमक का दाखवली जात नाही? असा सवाल करताना, राज्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज केली.

कर्नाटकमधील काँग्रेस सरकारने १९५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला केला असल्याचे सांगत वडेट्टीवार म्हणाले की, राज्यात ३५८ पैकी १९४ ताल-ुके हे दुष्काळाच्या छायेत असून १६ जिल्ह्यांमध्ये ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला आहे. सर्वाधिक प्रभावित भागात पश्चिम विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्याचा काही भाग आणि उत्तर महाराष्ट्राचा समावेश आहे. सध्या मराठवाड्यातील सर्वात मोठे धरण असलेल्या जायकवाडीत गत वर्षीच्या (९६.७५ टक्के) तुलनेत केवळ ३४.५२ टक्के पाणी साठा आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठे धरण असलेल्या उजनीमध्ये केवळ २३. ६५ टक्के पाणी साठा आहे. संपूर्ण उत्तर महाराष्ट्रातील नाशिक महसूल विभागातील धरणांमध्ये ६८.१२ टक्के, औरंगाबाद विभागात ३२.४५ टक्के आणि पुणे विभागात ७२.८७ टक्के पाणी साठा आहे. अशा परिस्थितीत अडचणीत आलेल्या शेतक-यांच्या समस्यांचे सरकारला काही पडलेले नाही, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

## मनपाकडून गणेशोत्सवाची तयारी पर्यावरण पूरक मूर्ती स्थापन करण्याचे आवाहन;यंदाही उभारणार मुर्ती संकलन केंद्र

लातूर/प्रतिनिधी : – गणरायाचे आगमन अवघ्या कांही दिवसांवर आलेले असताना लातूर शहर महानगर पालिकेकडून गणेशोत्सवाची तयारी केली जात आहे.विविध मंडळे आणि नागरिकांनी पर्यावरण पूरक गणेश मूर्ती स्थापित करण्याचे आवाहन पालिकेकडून करण्यात आले आहे. गतवर्षीप्रमाणेच घरगुती गणेश मंडळांसाठी मूर्ती संकलन केंद्र व मंडळांच्या मोठ्या मूर्तींसाठी गणेश मूर्ती विसर्जन केंद्रची व्यवस्था मनपाच्या वतीने करण्यात येणार आहे. गणेशोत्सव अवघ्या कांही दिवसांवर आला आहे.मंगळवार दि.१९ सप्टेंबर रोजी श्री गणेशा-ची स्थापना होणार आहे.या अनुषंगाने पालिका कामाला लागली आहे. गेल्या कांही वर्षांपासून प्रदूषण टाळण्यासाठी मनपा गणेश मूर्ती संकलन केंद्र कार्यान्वित करते. यामुळे गणेश मूर्ती पाण्यात विसर्जित केल्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाला कांही अंशी प्रतिबंध करता येऊ शकतो.

यावर्षी श्री गणेशाच्या स्थापनेपूर्वीच मनपाने या सर्व बाबींचे नियोजन केले आहे.नागरिकांनी आपल्या घरी पर्यावरण पूरक गणेश मूर्तींची स्थापना करावी. संकलन केंद्रात देता येतील अशा आकाराच्या मूर्ती स्थापित कराव्यात,असे आवाहन पालिकेने केले आहे.सार्वजनिक गणेश मंडळांच्या मोठ्या मूर्तींसाठी १२ नंबर पाटी जवळील खदानीत या मूर्तींचे विसर्जन करता येणार आहे. यासाठी संबंधित मंडळांनी स्वतः च्या वाहनाने मूर्ती तेथपर्यंत आणाव्यात, तसेच श्री गणेश मुर्तीचे विसर्जन मिरवणुक श्री सिध्देश्वर मंदीर परीसर, कव्वा रोड, बांधकाम भवन या ठिकाणी मिरवणुकी नंतर श्री गणेश मुर्तीचे संकलन करण्यात येणार आहे.

यावर्षी शहरात एकूण १५ ठिकाणी गणेश मूर्तींचे संकलन केले जाणार आहे.नांदेड रस्त्यावर यशवंत शाळा,विवेकानंद चौकातील पाण्याची टाकी,मंठाळे नगरमध्ये मनपा शाळा क्रमांक ९, सिध्देश्वर मंदिर, जिल्हाधिकारी कार्यालया जवळील शासकीय विहीर, बार्शी रस्त्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची पाण्याची टाकी,दयानंद महाविद्यालयाचा पार्किंग परिसर,सरस्वती कॉलनीतील पाण्याची टाकी,टाऊन हॉल, बांधकाम भवन,कव्हा रस्त्यावर खंदाडे नगर, साळे गल्लीतील यशवंत शाळा,तिवारी यांची विहीर,गणेश मंदिर व काशी विश्वेश्वर मंदिर ग्रीन बेल्ट या ठिकाणी यावर्षी मूर्ती संकलन केंद्र उभारली जाणार आहेत.

शहरातील नागरिकांनी पर्यावरण पूरक गणेश मूर्तींची स्थापना करावी. विसर्जना वेळी आपल्याकडील गणेश मूर्ती मनपाने उभारलेल्या संकलन केंद्रात द्याव्यात. पालिकेकडून या सर्व मूर्तींचे १२ नंबर पाटीवरील खदानीत विधीवत विसर्जन केले जाणार आहे.नागरिक व गणेश भक्तांनी या उपक्रमात मनपाला सहकार्य करावे, असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद फुलू दे ;आमदार धिरज देशमुख यांचे साकडे; बाभळगाव येथे बैलपोळा साजरा

लातूर : एकीकडे लम्पी चर्मरोगाचे सावट आहे. तर दुसरीकडे समाधानकारक पाऊस नसल्याने अनेक ठिकाणी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. दुष्काळसदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे बळीराजावरील सर्व संकटांचे निवारण करून शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद फुलू दे, सुख-शांती लाभू दे, असे साकडे 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी गुरुवारी येथे घातले.

बळीराजाच्या खांद्याला खांदा ला-वून काबाडकष्ट करणाऱ्या बैलांचे आज बाभळगाव येथे बैलपोळा सणानिमित्त



आदरणीय वैशालीताई विलासराव देशमुख, 'ला-तूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी पारंपारिक व घरगुती पद्धतीने पूजन करून हा उत्सव साजरा केला. 'हर हर महादेव'च्या जयघोषात शेती अवजारांचेही पूजन करून शेतकरी बांधवांना उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. लम्पी चर्मरोगाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेवून, प्रशासनाच्या नियमांचे पालन करीत यंदा हा उत्सव साधेपणाने साजरा करण्यात आला.

## सर्व शासकीय कामांसाठी जन्माचा दाखला पुरेसा

नवी दिल्ली : जन्म आणि मृत्यूची नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ नुसार येत्या १ ऑक्टोबरपासून देशभरात लागू होणार असून आता सर्व प्रकारच्या शासकीय कामांसाठी जन्माचा दाखला पुरेसा असणार आहे.

आपल्याकडे कोणत्याही प्रकारच्या कामांसाठी वेगवेगळ्या कागदपत्रांची आवश्यकता असते, ती कागदपत्रे गोळा करताना एखाद्याची दमछाकही होते. शेवटी नको रे ते काम अस-ही वाटायला लागतं. पण आता या सर्वातून कायमची सुटका होणार आहे. कारण सर्व प्रकारच्या कामांसाठी आता फक्त जन्माचा दाखला पुरेसा ठरणार असून त्याबद्दलचा निर्णय येत्या १ ऑक्टोबरपासून देशभरात लागू करण्यात येणार आहे. जन्म आणि मृत्यूची नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ अन्वये हा कायदा करण्यात आला आहे.




देशात जन्म आणि मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा, लागू झाल्यानंतर या कायद्याच्या अंमलबजावणीनंतर आधारपासून सर्व आवश्यक कागदपत्रे बनवण्यात जन्म प्रमाणपत्राची भूमिका वाढणार आहे. तुम्ही आधारपा-सून ड्रायव्हिंग लायसन्सपर्यंतची सर्व आवश्यक कागदपत्रे कोणत्याही अडचणीशिवाय केवळ जन्म प्रमाणपत्राद्वारे मिळवू शकता. हे विधेयक १ ऑगस्ट रोजी लोकसभेत आणि ७ ऑगस्ट २०२३ रोजी राज्यसभेत मंजूर करण्यात आले. यानंतर आता केंद्र सरकारने याबाबत अधिसूचना जारी करून १ ऑक्टोबरपासून नवीन नियम लागू करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे.

### कुठे होणार उपयोग?

शासनाच्या या निर्णयाचा फायदा सर्वसामान्य नागरिकांपासून विद्यार्थ्यांपर्यंत होणार आहे. त्यामुळे आता जन्म दाखल्याचे महत्त्व खूप वाढणार आहे. शाळा, महाविद्यालयात प्रवेश, ड्रायव्हिंग लायसन्ससाठी अर्ज, मतदार यादीत नाव जोडणे, आधार नोंदणी, विवाह नोंदणी किंवा सरकारी नोकरीसाठी अर्ज अशा अनेक कामांसाठी तुम्ही या एकाच कागदपत्राचा वापर करता येणार आहे.

### जन्म-मृत्यूची अचूक नोंद होणार

जन्म-मृत्यू नोंदणीच्या नियमांमध्ये बदल करण्यामागील मुख्य उद्देश केंद्र आणि राज्य स्तरावर जन्म-मृत्यूचा डेटाबेस तयार करणे हा आहे. हा नियम लागू झाल्यानंतर राज्य आणि केंद्र सरकार आपापसात जन्म आणि मृत्यूची आकडेवारी सहज शेअर करू शकतील.

### राष्ट्रीय डेटाबेस तयार होण्यास मदत

यासाठी राज्यांकडून मुख्य निबंधक आणि निबंधक नियुक्त केले जातील. मुख्य निबंधक राज्य स्तरावर डेटा राखण्याचे काम करतील. ब्लॉक स्तरावर हे काम कुलसचिवांमार्फत केले जाईल. यामुळे देशभरातील जन्म आणि मृत्यूचा राष्ट्रीय डेटाबेस तयार करण्यात मदत होईल आणि रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र यांसारखे अनेक डेटा बेस तयार करणे सोपे होईल.

## मनपाच्या वतीने मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर

लातूर :- मराठवाडा मुक्ती संग्राम अमृतमहोत्सव व ज्येष्ठ नागरिक दिन या निमित्ताने जिल्हाधिकारी, लातूर यांचे सूचनेस अनुसरून लातूर शहर महानगरपालिकेमार्फत, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाच्या सहकार्याने मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत मिरागी नेत्रालय, एम.आय.टी यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय व नेत्रप्रतिष्ठान डी.एस. कराड डोळ्याचे रुग्णालय, एमआयडीसी हे तीन रुग्णालय तसेच विल-ासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे मोतीबिंदू असलेल्या रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे.

यासाठी नुकतीच मा.आयुक्त श्री.बाबासाहेब मनोहरे यांचे अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली व शस्त्रक्रिया शिबिराचे नियोजन करण्यात आले. बैठकीत जिल्हा शल्य चिकित्सक, विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरागी रुग्णालय खाजगी नेत्ररोग संघटनेचे प्रतिनिधी, रोटरी, लायन्स क्लबचे पदाधिकारी व मनपाचे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

यांतर्गत मोतीबिंदू सदृष्य लक्षणे असलेल्या रुग्णांसाठी मनपाच्या प्रा.ना.आ.केंद्र येथे दि.१५ व १६ सप्टेंबर रोजी नेत्र रुग्णालयाच्या नेत्रचिकित्सा अधिकारी यांचेमार्फत प्राथमिक तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तपासणीमध्ये मोतीबिंदू आजार आढळून आलेल्या रुग्णांची गणेशोत्सवानंतर दि.१ ऑक्टोबर पासून टप्प्या-टप्प्याने मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

तरी मोतीबिंदू सदृष्य लक्षणे असणाऱ्या रुग्णांनीआपल्या नजीकच्या प्रा.ना.आ.केंद्र येथे दि.१५ व १६ सप्टेंबर रोजी प्राथमिक तप-ासणी करून घ्यावी असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येते.

## तत्कालीन जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांना जिल्हा प्रशासनाच्यावतीने हृद्य निरोप आयुष्यातले अविस्मरणीय क्षण लातूरने दिले; लातूरची सेवा संस्मरणीय राहील- पृथ्वीराज बी. पी.

लातूर (जिमाका) : आपल्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण लातूर जिल्ह्याचा जिल्हाधिकारी म्हणून काम करताना मिळाले, लातूरमध्ये सेवा करताना आलेले अनुभव मला समृद्ध करणारे ठरले. लातूर जिल्ह्याने दिलेले प्रेम माझ्या आयुष्यात संस्मरणीय राहील, अशी हृद्य भावना नागपूर स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा लातूरचे तत्कालीन जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी व्यक्त केली. त्यांच्या निरोप समारंभानिमित्त आणि नूतन जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांच्या स्वागत समारंभानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

नूतन जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, नूतन अप्पर जिल्हाधिकारी सुनील यादव, प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी नयन गोयल, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यावेळी उपस्थित होते.




लातूर जिल्ह्यात प्रशासनात काम करण्याचा आपला अतिशय चांगला अनुभव असून सर्व विभाग समन्वयातून काम करत असल्यामुळे अनेक विभागातून अत्यंत चांगले काम होते. जिल्हा परिषद आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्यात उत्तम समन्वय असल्यामुळेच राष्ट्रीय स्तरावर जिल्ह्याचा गौरव झाला असल्याची बाब यावेळी पृथ्वीराज बी. पी. यांनी अधोरेखित केली.

प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या सहकार्याने बहुप्रलंबित शेत रस्त्याचे उत्तम काम जिल्ह्यात झाले. अनुकंपाची भरती पूर्ण करून ती शून्यावर आणता आली. कुळाच्या नोंदी, महसूली कामाचे डिजटलायझेशन ही महत्वाची कामे पूर्ण झाली. गेल्या अडीच वर्षात आपल्या कार्यकाळात झालेली कामे अत्यंत समाधान देणारी झाल्याचा उल्लेख पृथ्वीराज बी. पी. यांनी यावेळी केला. अडीच वर्षाच्या सेवा काळात ज्यांचे-ज्यांचे सहकार्य लाभले त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून तुमचा सर्वांचा स्नेह कायम सोबत राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

पृथ्वीराज बी. पी. यांच्या काळात जी कामे सुरु झाली ती तेवढ्याच गुणवत्तापूर्ण पद्धतीने, वेगाने पूर्ण करू, अशी ग्वाही देऊन लातूर जिल्हा हा या महसूल विभागातला अत्यंत चांगला आणि गुणवत्तापूर्ण काम करणारा जिल्हा आहे. माझी काम करतानाची भूमिका पालकाची आहे. काम करणाऱ्यांना प्रोत्स-ाहन, न काम करणाऱ्याचे कान ओढून काम करायला लावणारी असेल. कमी बोलून काम अधिक करून दाखवावे, अशी माझी भूमिका असणार असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी स्पष्ट केले. काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या पाठीशी मी खंबीरपणे उभी असेन, अशी ग्वाहीही यावेळी जिल्हाधिकारी यांनी दिली.

यावेळी विविध विभागांच्यावतीने पृथ्वीराज बी. पी. यांचा कृतज्ञतापूर्वक गौरव करण्यात आला. नूतन जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे आणि अपर जिल्हाधिकारी सुनील यादव यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निव-ासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे यांनी केले. सर्व महसूल संघटनाचे प्रतिनिधी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांच्या तर्फे प्रतिनिधिक मनोगत व्यक्त करण्यात आली.

## संपादकीय....

# हत्ती हटाव शेती, बागायत बचाव!

कोकणातील जंगलामध्ये वाघ, हत्ती, गवारेडा, रानडुक्कर, माकड, वानर फार पूर्वीपासूनच होते. या सर्व वन्यप्राण्यांचा जंगलचा झलाका आपणच त्यांच्यावर आक्रमण करून, मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करून खऱ्याअर्थाने त्यांना उघड्यावर आणले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर जंगलतोड करताना आपण त्याचा साधा विचारही केला नाही की या जंगलांमध्ये राहणाऱ्या वन्यप्राण्यांनी जायचं कुठे? त्यांनी खायचं काय? या आपल्या अविचाराने आता वन्यप्राणी मनुष्यवस्तीकडे येऊ लागले आहेत. कोकणातील काही भागांमध्ये रानटी हत्तींचा त्रास आहे. विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यात रानटी हत्तींनी शेतकऱ्यांचं जगणचं मुश्कील करून ठेवलंय. सामान्य शेतकऱ्यांनी कष्टाने उभी केलेली शेती बागायत हत्तींनी पायदळी तुडवली आहे. पंधरा–वीस, पंचवीस वर्षे ज्या कष्टाने बागायत उभी करायची आणि वन्यप्राण्यांच्या एका फिरस्तीने ती उद्ध्वस्त व्हावी हे रानटी हत्तींच्या बाबतीत तरी घडत आहे. हत्तींना हटवण्यासंदर्भात आतापर्यंत राज्य सरकारकडून अनेक मोहिमा राबवल्या गेल्या.

'हत्ती गो–बॅक' मिशन महाराष्ट्राचे वन विभागाचे प्रधान सचिव अशोक खोत असताना राबविण्यात आले. लाखो रुपये या मोहिमेवर खर्च झाले; परंतु हत्तींना परतवण्यात यश आले नाही. त्यानंतर हत्तींना पकडण्याचाही प्रयत्न झाला; परंतु ती मोहीमही यशस्वी झाली नाही. हत्तींच्या संदर्भाने मोहीम राबवताना हत्ती कर्नाटकच्या जंगलामध्ये परतवण्याचा प्रयत्न करण्यात आला. या सर्व मोहिमा आजपर्यंत तरी अयशस्वी झाल्या आहेत. अपयशाचे नेमके कारण काय आहे याचा अभ्यास प्रथम राज्य शासनाच्या वनविभागाने करण्याची आवश्यकता आहे. सावंतवाडी, दोडामार्ग तालुक्यातील शेतकरी सतत रानटी हत्तींचा बंदोबस्त करा म्हणून मागणी करतात. हत्तींचा शेतकऱ्यांना नेहमीचा होणारा उपद्रव हा काही राजकीय 'इश्यू' नाही. तर तो सामाजिक प्रश्न आहे. रानटी हत्तींच्या वस्तीतील वावराने शेतकऱ्यांने काय करायचे हा प्रश्न आहे. माड–पोफळी, केळींच्या बागायती हत्तींनी उद्ध्वस्त करून गेल्या. वीस–पंचवीस वर्षे शेतकरी हवालदिल झाला आहे. महाराष्ट्र विधिमंडळाच्या अधिवेशनात कोकणातील हत्तींच्या प्रादुर्भावाचा विषय अनेकवेळा चर्चेला आला आहे. मंत्र्यांच्या दालनात अनेक बैठका पार पडल्या आहेत. त्यावर गांभीर्यपूर्वक चर्चा होऊनही हत्तींचा हा विषय पुन्हा बैठका आणि चर्चा या गुऱ्हाळातच अडकलेला असतो.

आता तर कोकणात केवळ हत्तींचा विषय जितका महत्त्वाचा झालेला आहे तितकाच गवारेडे, माकड यांचा लोकवस्तीत वाढलेला वावर फार मोठ्या चिंतेचा विषय आहे. एकिकडे कोकणातील शेतकरी ऋतुचक्राच्या अनियमिततेमध्ये कोणत्या फळपिकाचं काय होईल हे ठरवणं शेतकऱ्याला मुश्कील झालं आहे. यातच नारळ बागायत, आंबे या सर्वांवर माकडांनी केव्हाचाच कब्जा केला आहे. कोवळे नारळ तोडून उद्ध्वस्त करणारे माकडांचे कळप गावो–गावी फिरत आहेत. त्यांचा बंदोबस्त करण्याचा शेतकऱ्यांनी आपापल्या पद्धतीने प्रयत्न केला; परंतु त्यात कोणत्याही प्रकारे यश आलेले नाही. शेती बागायतीतला जसा माकडांचा वावर वाढला आहे तसा तो गवारेड्यांचाही अनेक गावांतून मुक्तसंचार सुरू आहे. शेती बागायती फार मोठ्या कष्टाने उभी करायची त्यासाठी दहा–वीस वर्षे मेहनत घ्यायची आणि एखाद्या वन्यप्राण्यांच्या कळपाने एका तासात वीस वर्षांच्या परिश्रमाची माती होऊन जाताना पाहावी लागते. यामुळे कोणत्याच शेतीत नव्याने येणारा तरुण शेतकरीही चिंतेने हैराण आहे. या प्राण्यांचा कसा बंदोबस्त करावा. शेती कशी वाचवावी हा प्रश्न आजच्या घडीला सर्वांसमोरचा आहे. हत्तींच्या बंदोबस्ताचा विषय ऐरणीवरचा आज झालेला आहे. तसाच उद्याला गवारेडा, माकड या प्राण्यांच्या वाढत्या संचाराचा विषयही भविष्यात नाही, तर आताच गंभीर बनला आहे. भविष्यात तो आणखीनच गंभीर होणारा आहे. या वन्य प्राण्यांच्या वस्तीतील शेती, बागायतीतील वावराला कसा आळा घालायचा हाच खरंतर यक्षप्रश्न आहे.

# एसटीचे आंदोलन मागे; गणपती बाप्पा पावला

श्रीगणरायाचे आगमन येत्या १९ सप्टेंबर रोजी होत असून बाप्पाच्या स्वागतासाठी एसटी महामंडळही तयारीला लागले होते. गणेश चतुर्थीच्या निमित्ताने कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी एसटी महामंडळाने यंदा १४ ते १९ सप्टेंबर दरम्यान तीन हजारांपेक्षा जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला. त्यापैकी १७०० बसेस–चे गट आरक्षण पूर्ण झाले आहे. आवश्यक वाटल्यास आणखी काही गाड्या सोडण्याची तयारी एसटी महामंडळाने दाखवली आहे. या जादा बसेस मुंबई, ठाणे, पालघर या विभागांतील प्रमुख बसस्थानकातून सोडण्यात येणार आहेत. मात्र एका बाजूला एसटी महामंडळाकडून इतर डेपोतील गाड्या कोकणाकडे कशा वळविल्या जातील, याचा विचार केला जात असताना, राज्यातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील कामगार संघटनेकडून सोमवारपासून एसटी कामगारांच्या प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यावेळी संघटनेकडून राज्य सरकारला दोन दिवसांचे अल्टिमेटम देखील दिले होते. मात्र त्यापूर्वीच एसटी कामगार संघटनेकडून तूर्त आंदोलन मागे घेण्यात आल्यामुळे विशेषत: कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांनी निश्वास सोडला आहे.



एसटी कर्मचाऱ्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता देण्याची मागणी राज्य सरकारकडून मान्य करण्यात आली. एसटी कर्मचाऱ्यांची सोमवारी रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री उदय सामंत यांच्यासोबत बैठक झाली होती. या बैठकीत एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याचा दर ३८ टक्क्यांवरून ४२ टक्के करण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांनी आंदोलन मागे घेतले आहे. मागील आठवड्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एसटी कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी दिली आहे. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ३४ टक्क्यांवरून ३८ टक्के करण्याच्या प्रस्तावाला मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली होती. सध्या राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेतनासाठी शासनाकडून अर्थसहाय्य देण्यात येते. त्यामुळे महागाई भत्त्यामध्ये ४ टक्क्यांची वाढ झाल्याने सरकारवर ९ कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. तरीही कर्मचारी संघटनेच्या म्हणण्यानुसार कर्मचाऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली, त्यात काहीही नवीन नाही, असा पवित्रा घेत आझाद मैदानात एसटीतील कर्मचारी उपोषणाला बसले होते.

जालना येथील मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी ठाम भूमिका घेणाऱ्या मनोज जरांगे–पाटील यांच्यामुळे सुरू असलेल्या आंदोलनामुळे राज्यभर त्याचे पडसाद उमटले आहेत. त्यामुळे ऐन गणेशोत्सव काळात एसटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारल्यास सर्वसामान्य नागरिकांचे हाल झाले असते. मात्र राज्य सरकारने या प्रश्नांवर गांभीर्याने भूमिका घेत, कर्मचारी संघटनेशी सकारात्मक चर्चा केली. मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत मंगळवारी बैठकीत झालेल्या निर्णयानुसार एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता आता ३८ टक्क्यांवरून ४२ टक्के देण्यात येईल, असा निर्णय झाला. तसेच एसटी कर्मचाऱ्यांची जी थकबाकी आहे, त्यासंदर्भात १५ दिवसांत निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन उदय सामंत यांनी दिले. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता आणि आर्थिक देणीबाबत समिती नेमून ६० दिवसांत अहवाल देण्याचे सरकारने मान्य केले आहे. एसटी कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना तसेच सेवानिवृत्त कामगार व पत्नीस सर्व प्रकारच्या बसमध्ये कुठलाही फरक न आकारता मोफत पास देण्याचा प्रस्ताव महामंडळाच्या संचालक मंडळांपुढे सादर करावा, या मागण्या मान्य झाल्याने आपले उपोषण आंदोलन स्थगित करत आहोत, असे संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी जाहीर केल्याने राज्यातील सर्वसामान्य एसटी प्रवासी एका अर्थाने खूश झाला आहे. एक वर्षांपूर्वी एसटी कर्मचाऱ्यांनी एसटी महामंडळाचे राज्य सरकारमध्ये विलीनीकरण घेण्याच्या मागणीच्या मुद्द्यावरून ५४ दिवसांपेक्षा अधिक काळ संप केला होता. हा संप मिटविण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने हस्तक्षेप केला होता.

राज्य सरकारने कर्मचाऱ्यांच्या मागण्याबाबत ठरावीक मुदतीत पूर्ण करू, असे आश्वासन दिले होते. तसेच जे कर्मचारी कामावर रुजू होणार आहेत, त्यांच्यावर कारवाई करू नये, असेही निर्देश खंडपीठाने महामंडळाला दिले. मात्र खूप दिवस चाललेल्या या संपाची दाहकता ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेने सहन केली. एसटीच्या संपामुळे खासगी वाहनांकडून प्रवाशांची लुटमार होत होती. सवलतीच्या तिकिटावर शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा आर्थिक फटका बसला होता. राज्य सरकारकडून एसटीमध्ये महिलांना ५० टक्के तिकिटांची सवलत जाहीर करण्यात आल्यानंतर एसटीमधील प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे गौरी–गणपतीच्या सणात एसटीतून प्रवास करणाऱ्या महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे एसटी कर्मचारी संघटनेने गणेशभक्त आणि सर्वसामान्य प्रवाशांची गैरसोय होऊ नये, यासाठी तूर्त आंदोलन मागे घेण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो खरोखरंच स्वागतार्ह आहे.

# बोलुन मोकळं व्हायचं....

बोलुन मोकळं व्हायचं हे शब्द किती सहज तोंडाबाहेर पडतात आणि एक जन त्याला समर्थन करतो तर दुसरा एक माईक चालु असल्याचे लक्षात आणून देतो. यातून विकासाच्या नावाखाली एकत्र आलेले नेते जनतेच्या प्रश्नांवर किती बेजबाबदार आहेत याची कल्पना येते. बोलुन मोकळं व्हायच हे शब्द सहज जरी बाहेर पडले असतील तरीही या मागची भुमिका मात्र सहज नाही. बोलुन मोकळं व्हायच म्हणजे आंदोलकांनी जी मागणी केली त्यावर पडदा टाकण्याचे काम करायचे. बोलुन मोकळं व्हायच म्हणजे जनतेच्या आंदोलनाची, समस्यांची दखल घ्यायची नाही, बोलुन मोकळं व्हायच म्हणजे फक्त बोलायच काम नाही करायच, बोलुन मोकळं व्हायच म्हणजे फक्त राजकारण करायच, बोलुन मोकळं व्हायच म्हणजे समस्या सुटणार नाही याची काळजी घ्यायची, बोलुन मोकळं व्हायच म्हणजे जबाबदारी झटकायची. बरं बोलुन मोकळं व्हायच असे एखादा कर्मचारी अधिकारी बोलला असता तर समजू शकलो असतो. परंतु बोलुन मोकळं व्हायच हे मुख्यमंत्री बोलताना, एक उपमुख्यमंत्री त्यांच्या या मताला अनुमोदन देतात,तर दुसरे उपमुख्यमंत्री समोर माईक सुरू आहे याची जाणीव करून देऊन गप्प बसायला सांगतात. म्हणजे हिंदुच्या विकासासाठी एकत्र आलेले, जनतेच्या विकासासाठी एकत्र आलेले नेते हिंदु मराठा समाजाच्याच समस्या गांभीर्याने घेत नाहीत तर तिघेही मिळून समाजाची दिशाभूल करतात. अनेक कट कारस्थान करून फोडाफोडीचे राजकारण करून लोकशाही ला न जुमानणारे राजकीय नेते लोकांना व लोकांच्या समस्येला जुमानणार तरी कसे? हा ही तेवढाच महत्त्वाचा प्रश्न आहे. लोकांना जाती धर्माच्या नावाखाली भावनिक बनवून लोकांच्या समस्या वाढवून भ्रष्ट नेत्यांना स्वच्छ करणाऱ्या सरकार कडे जात धर्म हाच एक मुद्दा आहे ज्या मुळे ते लोकांचे लक्ष मुख्य मुद्यावरून हटवू शकतात. जाती धर्माच्या नावावर लोक एवढे भावनिक झाले की स्वतः घरात बेरोजगार तरुण आहेत, खाण्याचा प्रश्न आहे, शिक्षण आरोग्याचा प्रश्न आहे. उधार पैसे घेऊन शिक्षण घ्यावे लागते, कर्जाने पैसे घेऊन दवाखाना करावा लागतो तरीही अंधभक्त म्हणतात धर्म आणि जात धोक्यात आहे. अशा अंधभक्तांना नेमकं काय म्हणाव हेच कळत नाही. राजकीय नेत्यांना बापापेक्षा जास्त महत्त्व देऊन नेत्याने सांगितली तेच पुर्व दिशा म्हणून माणणारे, व राजकीय नेत्यांनी पेटवले तेव्हा घरा दाराचा विचार न करता भविष्याचा विचार न करता धर्माच्या रक्षणासाठी दंगल करणारे भक्त अनेक आहेत. दंगली मध्ये अडलेल्या तरूणांना बाहेर काढायला एकही पुढारी येत नाही तरीही भक्तांना कळत नाही येथे माणूस अडचणीत आहे की धर्म? माणूस अडचणीत आहे याचे चटके माणूस सहन करत असताना ही जेव्हा राजकीय लोक सांगतात धर्म धोक्यात आहेत तेव्हा भक्त लोक माणसाच्या अडचणीचे चटके सहन करून धर्माच्या रक्षणासाठी समोर येतात. आणि याच समोर येणाऱ्या लोकांचा फायदा राजकीय नेते व पक्ष करून घेतात. जेव्हा सर्व सामान्य माणूस जिवन जगत असतो तेव्हा त्याला कधीच वाटत नाही धर्म धोक्यात आहे. त्याच्या डोक्यात सतत कुटुंबाचे विचार सुरू असतात. मुलांचे शिक्षण, आईवडीलांचा दवाखाना, शेतीसाठी खर्च, बाजाराची जुळवाजुळव, महागाईच्या काळात काय घ्याव काय घेऊ नये याच विचारात तो असतो. परंतु टिव्ही सुरू केली की हे सर्व विचार त्याचे बाजूला जाऊन समोर तो म्हणजे धर्म. आणि धर्माच्या नावाखाली राजकीय नेत्यांचे समर्थन केले गेले, धर्माच्या व जातीच्या नावाखाली गुन्हेगार व आरोपींना समर्थन दिले गेले, धर्माच्या नावाखाली चुकिच्या बाबी दुर केल्या गेल्या नाही तर धर्म धोक्यात येणार नाही पण त्या धर्मातील लोकांच्या समस्या वाढतील, गुन्हेगारी प्रवृत्ती वाढते, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तो माणूस स्वतः स्वतः ची अधोगती करायला सुरुवात करतो. म्हणून धर्म ही वैयक्तिक बाब आहे ती माणसाने घरात जगायला पाहिजे. बाहेर पडल्यावर माणसाला शिक्षण, आरोग्य, रोजगार, महागाई या बाबींची गरज पडते. आज पर्यंत धर्माच्या नावावर अनेक दंगली घडवून आणल्या गेल्या लाखो तरुणांवर गुन्हे दाखल झाले, अनेक तरुण धर्माच्या नावावर रस्त्यावर उतरतात परंतु बेरोजगार आहेत. जे नेते म्हणतात धर्म धोक्यात आहेत ते कधी बेरोजगार तरुणांना धर्माच्या नावावर घरखर्च देतात? ज्या तरुणांनी धर्माच्या नावावर गुन्हे दाखल करून घेतले त्यांच्या जमानतीचा व वकिलाचा खर्च धर्माच्या नावावर लढवणारे नेते करतात? धर्मातील लोकांना शिक्षण, आरोग्य, रोजगार यासाठी धार्मिक स्थळांमध्ये जो हजारो करोडो रुपयांचा पैसा जमा होतो त्या पैशाचा फायदा कधी शेतकरी, विद्यार्थी, बेरोजगार तरुच यांना होतो. या पैकी एखाद्या बाबी मध्ये जरी धर्माचा फायदा होत असेल तर खुशाल त्यांनी त्यांच्या प्रमाणे वागावे. परंतु जर धर्माचा अडी अडचणीला फायदा होत नसेल तर तेव्हा धर्माच्या नावावर बोलणाऱ्या आणि जनतेला भावनिक करून दिशाभूल करणाऱ्यांना नेत्यांना जनतेने प्रश्न विचारून धर्मावर नाही तर कर्मावर बोलायला भाग पाडले पाहिजे. राजकीय नेत्यांनी हातात सत्ता असताना धर्म व धर्मातील लोकांसाठी काय केले या बाबत प्रश्न विचारायला पाहिजे. परंतु सध्या परिस्थिती अशी आहे की काही भक्त म्हणतात महागाई कितीही वाढली तरी चालते पण सरकार हेच पाहिजे. हेच का पाहिजे याचे उत्तर कोणाकडेच नाही. देशातील बहुतांश जनता अनेक समस्येशी झुंजत असताना जनतेच्या समस्या सुटत नसतील तर राजकीय नेते व सत्तेचा काय उपयोग. सरकार प्रश्न सोडवत नाही म्हणून आंदोलन करावे लागते आणि आंदोलन करूनही सरकार जर त्या आंदोलकांची हेटाळणी करून फक्त बोलुन मोकळं व्हायच असे बोलत असेल आणि लोकांना चिड येत नसेल तर आजही आपण गुलाम आहेत हे लक्षात येईल. महाराष्ट्र भर आंदोलन करून जिवाची बाजी लाऊन तरुण मागण्या करत असतील आणि सत्तेत बसलेले एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री हे जर दखल घेत नसतील तर मग परिस्थिती मात्र खुपच गंभीर आहे हे लक्षात येते. भारत हा जातीप्रधान देश आहे. येथे जातीवर लढवले जाते पण जातीवर काम केले जात नाही. मराठा समाजाचे आमदार खासदार संख्येने जास्त असताना मराठा समाजाच्या मागण्यांची हेळसांड कँमेरा समोर होत असेल. आहे हे होत असतात मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री एकमेकांना सांभाळून घेत असतील तर जनतेच्या समस्येवर तोडगा नेमका काढायचा कोणी? संख्येने जास्त असलेल्या मराठा लोकांची ही परिस्थिती आहे तर अनुसूचित जाती जमाती यांचे आमदार खासदार संख्येने खुप कमी आहेत. तर या समुहातील लोकांच्या समस्या किती गंभीर असतील याचा विचार करणे गरजेचे आहे. मराठा समाजाकडे आर्थिक मजबुती असल्याने काही गोष्टी ते पैशामुळे करू शकतात परंतु ज्यांच्या कडे पैसा च नाही अशा समूदायांनी आपल्या समस्या नेमक्या सोडवायच्या कशा हा संशोधनाचा विषय आहे. संख्येने जास्त, आमदार खासदार जास्त असुनही जर मराठा समाज समस्या ग्रस्त असेल तर न्यायीक दृष्टीने विचार केला तर इतर समाजातील लोकांच्या समस्या सोडवायला कोणी वालीच नाही. जाती प्रधान देशात अगोदर जातीला महत्त्व दिले. माणूस व कर्म यांना जातीच्या बाहेरच्या चष्म्यातून कधीच बघितले जात नाही. आपण जातीचा चष्मा उतरवून कधीच माणसा कडे माणुसकी च्या चष्म्यातून बघितले जात नाही म्हणून सामाजिक समस्या वाढत आहेत. सत्तेत बसलेले जातीचे आहेत म्हणून त्यांच्या विरोधात बोलले जात नाहीत समस्या कायम आहेत. हे जर लोकांना कळाले आणि लोक जाती धर्माची बंधने तोडून केवळ सामाजिक समस्येवर एकत्र येऊन बोलायला लागले तर शिक्षण आरोग्य रोजगार यावर सरकार ला काम करावेच लागेल. जनकल्याण सरकार ला साध्य करावेच लागेल परंतु त्यासाठी लोकांना व्यवस्था कळणे आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे संविधानाने दिलेल्या हक्क अधिकाराची जाणीव होऊन मताधिकार हा सर्व श्रेष्ट अधिकार आहे याच अधिकारामुळे सत्तेत कोण असेल आणि कोण नसेल हे जनता ठरवु शकते. परंतु सुरवातीला या अधिकाराचा वापर लोकांनी जात पाहुन जातीच्या लोकांना मते देण्यात केला. आणि नंतरच्या काळात ईव्हीएम ने लोकांचा हा अधिकार काढून घेतला. आता लोक नाही तर ईव्हीएम ठरवते कोण निवडून येईल तर. म्हणून ईव्हीएम ला विरोध करून पेपरवर निवडूक घेण्याची मागणी लोकांनी एकत्र येऊन केली तर शासन आपल्या दारी नाही घरी येऊन आपले काम करेल. लोकांच्या समस्या सोडवेल. परंतु ईव्हीएम वर निवडणूक होत असेल तर सत्ताधारी जनतेच्या प्रश्नांना कधीच गांभीर्याने घेणार नाहीत. मग त्यांची भुमिका एकच असेल. बोलून मोकळं व्हायच..

----------------

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार.

भारत हा कृषिप्रधान देश होता.बहुसंख्य लोक शेतीवर अवलंबून कामधंदा, व्यवसाय व्यापार करायचे.त्यामुळेच एका कुटुंबाचा अनेक कुटुंबाशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण होत होते.त्यातूनच सामाजिक बांधिलकी म्हणून एकमेकाची खूप इज्जत करायचे खानदानी नात्याला महत्व असायचे त्यामुळे कोणी ही कोणा बद्दल नकारात्मक विचार करतच नव्हते.कारण घरा घरात सकारात्मक विचारांचे संस्कार लह–ानपणापासून घरा घरात होत होते.म्हणूनच एकत्र कुटुंबात नातू पणतू झाले तरी कुटुंब एकत्र राहत होते.तेव्हा शिक्षणाला महत्व नव्हते संस्कार महत्वाचे होते.आणि ते पांच दहा मिनिटाच्या वागणुकीतून दिसून येत होते.हेच एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार प्रेरणादायी आणि लक्षवेधी होते.आज ते जवळ जवळ संपले.

पांच भाऊ तीन बहिणी लग्न झाल्यावर ही एकत्र कुटुंबात एकत्र स्वयंपाक करून एकत्र जेवत होते.पांच भावाच्या मुलामुलीचे लग्न होऊन त्यांना मुलमुली होऊन त्यांचे ही लग्न होऊन नात सुना घरात आल्यावर ही एकत्र कुटुंब गुण्यागोविंदाने राहत होते.वडिलधारयांचा योग्य तो मान सन्मान दिला जात होता.घरातील आर्थिक व्यवहार मोठा भाऊ सांभाळत होता,कोणी ही कधी कोणतीच तक्रार करीत नव्हता आणि त्यांच्या बायका कधीच आर्थिक व्यवहारात ढवळाढवल करून विचार पूस करीत नव्हत्या,एवढे महान संस्कार त्यांचावर झालेले असत.आज मुला– मुलींना शिक्षण खूप मिळते पण संस्कार कुठे ही दिसत नाही.

आजची मुल शाळा महाविद्यालयातून पदव्या घेऊन बाहेर पडलेले आहेत.त्या पदव्यामुळे त्यांना चांगली नोकरी मिळते,त्यानंतर बायको.मग नवीन संसार सुरु होते.बायकोला स्वतचा टू बी एच के प्लॉट पाहिजे.एकत्र कुटुंबात तिला गुदमुद्ल्या सारखे होते.हा शिक्षण आणि संस्कार यातील फरक उघड होतो.मग सुरु होते महाभारत.

दोन सुशिक्षित मुलाचे वडील स्वर्गवासी झाल्यामुळे सर्व संपती आईच्या नांवे असते. आईच्या नावे असलेली जागा आपल्या ना–वावर करून घेण्याची सुप्त इच्छा मनात धरून आईच्या ताब्यासाठी दोन भाऊ भांडत होते.आईला विचारल्यावर ती म्हणाली जो माझ्या तीन औषधाच्या गोळ्यांची नावे एका झटक्यात सांगेल त्याच्याकड़े मी जाईन. दोन्ही भाऊ खजील झाले.हा एकत्र कुटुंबातील शिक्षण आणि संस्कार यातील फरक ठळकपणे आईने दाखवून दिला.एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार.शिक्षणासाठी दूर देशी गेलेल्या गरीब होतकरु मुलाने आईला पत्र पाठवले त्यात त्याने लिहिले,इथे माझी जेवणाची चंगळ आहे. काळजी करु नकोस. आईने ते पत्र वाचून एक वेळेचे जेवण सोडले कारण पत्राच्या शेवटी मुलाच्या अश्रुने शाई फुटली होती.मुलांला पत्र लिहून पाठवतांना जे लक्षात आले नाही,ते आईच्या कसे लक्षात आले. कृषिप्रधान देशातील अशिक्षित अडाणी शेतकरी शेतातून कोणी खाण्याचे फळ,शेंगा,आंबे चोरून खाल्ले तर भांडत नव्हता.तर विचारून मागितले असे तर दिले असते,चोरी करण्याची गरज काय होती असे बोलत होता.आताचा शेतकरी आंब्याच्या झाडावर चढून चोरुन आंबे काढणाऱ्या मुलांच्या पाठीत काठी घालून त्याला शिक्षा म्हणून किंवा थोडा वेळ धाक म्हणून त्यामुलांना झाडाला बांधून ठेवतो. त्यांची निसर्ग घेतो आणि का कुणास ठाऊक पण त्यानंतर त्या झाडाला कधीच मोहर येतच नाही.निसर्ग हि शिक्षणातील व संस्कारातील फरक ओळखतो.कृषिप्रधान देशातील शेतकरी शेतातून दमून घरी आला की आई बाबा आजीचे पाय चेपून देत होता.ते पाहूनच त्या शेतकऱ्याचा मुलगा शिक्षण घेऊन मोठा साहेब झाल.शहरात आला ऑफीसातून दमून घरी आल्यावर बाबाने आजीचे पाय चेपून दिल्याचे पाहून नातीने न सांगता बाबाच्या पाठीला तेल लावून दिल्याचे पाहून आजी म्हणाली, ताटातील वाटीत आणि वाटीतलं ताटात. हेच संस्कार एकत्र कुटुंबात लहानपणापासून होत असतात.तेच शेतकऱ्याची मुल शिक्षण घेऊन शहरात गेले की संस्कार विसरतात.मग त्यांची मुल त्यांना घरात ठेवत नाही तर वृद्धाश्रमात ठेवतात.हे आज खुलेआम केल्या जात आहे.कोणाची भितीच राहिली नाही.कारण एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार राहिलेच नाही. उच्च शिक्षित मुलांनी वडील गेल्यावर भावांनी संपतीची वाटणी केली. म्हाता–या आईला आपल्या घरी नेताना बहीण म्हणाली, मी खुप भाग्यवान, माझ्या वाट्याला तर आयुष्य आलय.यातून आपण काय बोध घेणार आहोत?.एकाच घरात मुलगा आणि मुलगी लहानची मोठी होतात.शिक्षण आणि संस्कार घेतात मग हा फरक कसा पडतो?. एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार मुलामुलीवर होत असतात.मुलमुली उच्च शिक्षण घेऊन मोठे झाले तरी घरातील संस्कार विसरत नाही.एक मुलगा आपल्या बाबांना म्हण–तो बाबा मी तुला सोडून कधीच कुठे जाणार नाही कारण तू पण आजी आजोबांना सोडून कधीच कुठे गेला नाहीस. असे ऐकून कोणत्या बाबाला एकदम वडिलोपार्जित प्रॉपर्टी नावावर झाल्यासारखे फीलिंग आल्याशिवाय राहत नाही.



एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार कसे असतात.त्या कुटुंबातील मुलमुली मोठी झाल्यावर कशी मदत करतात.एका मुलीच्या नवऱ्याचा मित्र भेटायला हॉस्पिटल मध्ये आला, तो खूपच आजारी होता म्हणून. जाताना मित्राच्या बायकोच्या हातात पाच हजार रुपयाचे पाकीट बळजबरीने कोंबून गेला. म्हणाला, लग्नात आहेर द्यायचाच राहिला होता. माझा दोस्त बरा झाला की छानसी साडी घ्या.त्या पाकिटा पुढे आज सारी प्रेझेंट्स फोल वाटली तिला.कारण हे संस्कार एकत्र कुटुंबात होतात.एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार महिला महिलांना कसे समजून घेतात.यावरच अवलंबून असतात.सध्या बाहेर इतके नकारात्मक विचार पेरले जातात की लोकांचा माणसातल्या चांगुलपणा वरचा विश्वास उडत चाललाय. अशावेळी अशा सकारात्मक विचारांच्या छोट्या छोट्या गोष्टी माणसांना खूप मोठी प्रेरणा देऊन जातात.सोशल मिडीयावर ह्या खूप येतात.त्या कोण किती गांभीर्याने घेतात हा त्यांचा त्यांचा प्रश्न आहे.पण मला त्या आवडतात मी मग त्यांचे असे संकलन करून ठेवतो.त्या सर्व एकत्र केल्या की असा प्रेरणादायी आणि लक्षवेधी लेख तयार होतो.विभक्त कुटुंब पद्धतीमुळे प्रथम सासू सुना नंतर आजी आजोबा नांत जवळ जवळ संपले आहे.एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार हे आज कुठे ही फारसे दिसत नाही.स्मार्टपणा वाढत चालला त्यांना स्मार्ट फोन मोबाईलवर अर्धा एक तास बोलण्यासाठी वेळ आहे.समोर बसून कुटुंबातील व्यक्तीशी बोलण्यासाठी वेळ आणि विषयच नाही.हा प्रत्येक व्यक्तीच्या विचारातील सकारात्मक आणि नकारात्मक विचार आहे.जनावर एकत्र राहतात पण ते मुके प्राणी भावना समजून वागतात.आज माणसांना टू बी एच के,थ्री बी एच के मध्ये एकत्र राहून कोणाच्या कोणत्याही भावना समजत नाहीत.कारण काय?. तर एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार.

सागर रामभाऊ तायडे,९९२०४०३८५९,भांडूप,मुंबई.

# चिवरदान आणि त्यांचे महत्व.

आपण सर्वांनी तथागत गौतम बुद्धांच्या अंगावर एक भगव्या रंगाचे वस्त्र पहिले असेल ते वस्त्र काय असते? कसे असते? याबद्दल थोडक्यात महिती घेऊ,चिवर म्हणजे काय ?.

बुद्धपुत्र श्रामनेर व भिक्षु यांना धर्मगुरूंच्या कडून विधिवत दिलेलं पित्तवस्त्र तथा काशाय वस्त्र म्हणजे चिवर होय. काशाय वस्त्राचा अर्थ त्याग होय. भिक्खुच्या अंगावर असणाऱ्या नारंगी (भगव्या) कापडास चिवर म्हणतात.

चिवराची निर्मिती केव्हा झाली?.इ.स.पूर्व ५२८ साली भगवान बुद्धांना बुद्धगया येथे बुद्धत्वं प्राप्त झालं आणि त्यांनी आपल्या पहिल्या पाच बौध्द भिक्खुना सारनाथ येथे पहिले धम्म प्रवचन दिले. आणि भिक्खु संघाची स्थापना केली तेव्हा पासून चिवराची निर्मिती झाली.

विनयानुसार भिक्षुना ३ वस्त्रे धारण करवी



लागतात.

अंतरवास

उत्तरासन (५ हात लांब ४ हात रुंद)

संघाटी

बौध्द धम्म आणि चिवर

चिवर दहा तुकड्याचे आसवे (दहा पारमिता) त्याची पट्टी ६५/२७ इंच असावी.

त्याला ८ पट्टया असतात. (अष्टांग मार्ग)

चार कोपरे दुमडलेले असावे. (चार आर्यसत्य)

चिवर परिधान करण्याच्या पद्धती

एकांशि एक खांदा उघडा असतो (बऱ्याचश्या बुद्ध मूर्ती किंवा बुद्धांच्या चित्रात या प्रकारचे चिवर परिधान केलेले असते.परिमंडल संपूर्ण शरीर झाकलेले असते फक्त डोके आणि चेहरा उघडा असतो.चिवर घेण्यासाठीची बंधने

कुटुंबाची परवानगी

स्वतःची इच्छा

धम्माप्रति आदर

मनाने अपंग नसावा

पाप विचार मनात ठेवणारा नसावा

शरीराने अपंग नसावा

व्यसनाधीन नसावा

दोषी गुन्हेगार व्यक्ती नसावा

फरार चोरी खुनाचा आरोपी नसावा

चिवरदान (वस्त्रदान) भोजनदान द्रव्यदान,श्रमदान असे खुप दानाचे विविध प्रकार आहेत. पण या सर्व दानात धम्मदान सर्वश्रेष्ठ आहे. दुःख मुक्ती आणि परम सुख शांती प्राप्तीचे मार्गदर्शन करणे म्हणजेच धम्मदान देणे होय. धम्म मार्गानेच व्यक्ती, कुटुंब आणि समाज सुखी होऊ शकतो. सामान्य माणूस म्हणून आपणास प्रत्यक्ष धम्मदान समाजाला देता येत नसले तरी धम्मदानाच्या कार्यात आपण विविध प्रकारे सहाय्य करू शकतो.

धम्मदान कार्याला प्रेरणा देऊन इतरांना उत्तेजन देऊन अनेक मार्गाने या पवित्र कार्यात आपण मदत करू शकतो.

मानवीकल्याणा साठी धम्म प्रचार/प्रसार वाढीकरिता विविध प्रकारचे योगदान देऊन आपण धम्म सेवेचे भागीदार बनू शकतो. त्यात भिक्खूंना विहार,भिक्खू निवास,चिवरदान,भोजनदान,औषधाचे आर्थिक दान व इतर जीवनावश्यक वस्तूंचे दान,द्रव्यदान तसेच धम्मकार्यात आपल्या शारीरिक व बौद्धिक शक्तीचा काही अंश लावावा या शुद्ध भावनेने केलेले विविध प्रकारचे श्रमदान हे सर्व धम्म वृक्षाला खतपाणी दिल्यासारखेच असते.जो व्यक्ती अशाप्रकारे वृक्षाला खतपाणी घालतो तो महान पुण्याचा (कुशल कर्माचा) अधिकारी होत असतो. धम्माची महान शक्ति पदोपदी त्याचे रक्षण करीत असते.

दान पारमितेला बौद्ध धर्मामध्ये अतिशय महत्त्वाचे स्थान आहे.जीवन समृद्ध करण्यासाठी* व्यक्तीला दान पारमिता पुर्ण करणे आवश्यक आहे.सद्धम्म प्रचार प्रसार करिता आवश्यक वस्तूचे दान करून कुशलकर्माचा संचय करावा.

भंते शाक्यपुत्र राहुल
९८३४०५०६०३

# ओबीसी सुतार बांधवांनो प्रथम संघ शक्ती निर्माण करा.

ओबीसी सुतार समाजाची लोकसंख्या राज्यभरात जवळपास ४५ ते ५० लाख असल्याचे माझ्या वाचनात आले आहे परंतु,सुतार समाजात स्वयंघोषित समाज नेत्यांनी त्यांच्या नेतृत्वाखाली कधीही सुतार समाजात समाज जागृती मेळाव्यात जमिनीवर हजारोंच्या संख्येने समाज बांधवांना एकत्रित केलेले नाही मग ओबीसी सुतार समाजात संघ शक्ती निर्माण कोणत्या पध्दतीने होईल म्हणजे लाखोंच्या संख्येने समाज एकत्रित एकसंघ एका छताखाली येईल कसा हा प्रश्न अनुत्तरित राहतो.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात राज्यस्तरीय समाज संघटनांचे जाळे माझ्या माहिती प्रमाणे संपुर्ण राज्यभरात विस्तारित आहे तालुका पातळी ते जिल्हा पातळी ते थेट राज्यस्तरीय पातळीवर विविध विभागवार जबाबदार पदांची निर्मिती करून असंख्य पदाधिकारी वर्गाची निवड करण्यात आलेली असते आणि अशाच पध्दतीने संघटनेच्या माध्यमातून ओबीसी सुतार समाजात असंख्य जबाबदार कर्तबगार कर्तृत्ववान समाज नेतृत्व म्हणुन उदयास येतात.प्रत्येक संघटनेच्या माध्यमातून समाजहित कारक समाज विकासात्मक आणि विविध विषयांवर समाज जागृती इत्यादी बाबतीत कारभारावर देखभाल करण्यासाठी सुशिक्षित बुद्धिमान,बुद्धिजीवी,बुद्धिप्रामाण्यवादी समाज बांधवांची सामाजिक भान असणाऱ्या

संपुर्ण राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजाची खडानखडा माहिती असणाऱ्या कर्तव्यदक्ष एका प्रमुखाची निवड केली जाते जेणेकरून संघटनेच्या माध्यमातून संपुर्ण राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात विविध विकासात्मक आणि विविध विषयांवर समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित केले जातील कोणत्याही प्रकारची संघटना निर्माण करण्याचा एकमेव उद्देश असतो समाजात विविध विकासात्मक कार्यक्रम राबविणे आणि विविध विषयांवर समाज जागृती कार्यक्रम आयोजित करणे जेणेकरून समाज वैचारिक दृष्टीने प्रगल्भ होईल आणि विकासात्मक दृष्टीने सर्वगुणसंपन्न होईल.

विश्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक असूनही समाजात ओबीसी, संविधान आणि जनगणना बद्दल समाजात समाज जागृती अभियान कार्यक्रमाचे आयोजन केले जात नाही पर्यायाने ओबीसी सुतार समाज वैचारिक कार्यक्रमात समाज जागृती कार्यक्रमात संबंधित समाज नेतृत्वाखाली हजारोंच्या संख्येने एकत्रित येत नाही त्यासाठी सांगावेसे वाटते कि,ओबीसी सुतार बांधवांनो प्रथम संघ शक्ती निर्माण करा.

मार्शल सुतार या व्हॉट्सअप ग्रुपवरील माझ्या समाज लिखाणाची खऱ्या अर्थाने बाग फुलवीणारे राज्यातील अनेक वर्तमान पत्रांच्या माध्यमातून माझे लेख प्रसिद्ध होतात त्याबद्दल मी सागरजी तायडे साहेब आणि मालक,संपादक पत्रकार बंधुचे मनपूर्वक धन्यवाद आणि जाहीर आभार मानतो.

ओबीसी सुतार समाजाच्या नेत्यांना प्रमोद सूर्यवंशी रिकामटेकडा दिड शाहणा वाटत होता.माझ्या लिखाणाला कोणीच वैचारिक दृष्टीने तर्कशुद्ध पध्दतीने मुद्देसूद उत्तर देत नव्हते. किंवा चर्चा सुद्धा केली जात नव्हती. त्यामुळे राज्यातील अनेक वृत्तपत्रात लेख प्रसिद्ध होत असल्यामुळे सुतार समाजांच्या कार्यकर्त्यात आणि नेत्यात मोठी उलथापालथ होत होती. याचे लेख कसे प्रसिद्ध होतात हाच मोठा प्रश्न त्यांच्या समोर होता.*समाज बांधवांना* सांगितल्या जात होते.कि त्या प्रमोद सूर्यवंशी याची लायकी नाही त्याचे लेख कशाला प्रसिद्ध करता. ह्या सुचना किंवा आदेश दिल्या जात होते.पण कुठे काय.? एक वेळ अशी होती की,मि असलेल्या,नसलेल्या सुतार समाज सोशल मीडियावर माझी पोस्ट शेअर करण्यास समाज बंदी असायची कारण ओबीसी सुतार समाजात समाज जागृती निर्माण झाली तर स्वयंघोषित समाज नेत्यांच्या खऱ्या खोट्या अस्तित्व–ाला धक्का बसेल.

वास्तविक माझं समाज लिखाण सामाजिक क्षेत्रा–तील विविध विषयांवर असते.माझं लिखाण व्यक्तिपूजा करणाऱ्या,व्यक्तीभोवती फिरणार नसते.माझ्या समाज लिखाणात व्यक्तिगत उल्लेख शक्यतो मी टाळत असतो त्याची काळजी घेत असतो कारण मी व्यक्तिपूजेला मानत नाही.मी सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक,राजकीय धार्मिक क्षेत्रात व्यक्तिपूजा मानत नाही आणि मानणार नाही.सामाजिकच नव्हे तर सर्व क्षेत्रात व्यक्ति पुजेला महत्व दिले नाही पाहिजे.यावर मी ठाम आहे.मी म्हणण्यापेक्षा आम्ही म्हटले,लिहले तर समाज बांधव आणि इतर समाजाचे बांधव मैत्री करू शकतात.हे मला आज माझे समाज लिखाण

राज्यभरातील विविध वृत्तपत्रात लेख प्रसिध्द होतात त्यामुळेच कळते. ज्या माझ्याच समाजात माझं समाज लिखाण सोशल मीडियावर शेअर करायला बंदी याला संकुचित समाज वृत्ती म्हणता येईल.आपल्याला आपल्याच स्वसमाजात समाज अपमान निदान एकवेळ तरी अनुभवयास हवा नाही का,अपमान झाला तरी लिखाण जिद्दीने सुरु ठेवले अगदी सभ्य भाषेत आणि संवैधानिक पध्दतीने.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान निर्माण करतांना ओबीसीं साठी संविधानात कलम निर्माण केलेले असुन त्याचा उपयोग ओबीसी सुतार समाज नेत्यांनी समाजात समाज विकासात्मक आणि समाज प्रबोधनात्मक कार्यासाठी करणे गरजेचे आहे परंतु,ओबीसी सुतार समाजात ओबीसी,संविधान आणि जनगणना बद्दल विषयावर चक्कार शब्द सुद्धा काढतांना दिसत नाहीत त्यामुळे ओबीसी सुतार समाजात या विषया बद्दल खऱ्या अर्थाने समाज जागृती निर्माण होत नाही त्यासाठी समाज नेत्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

शेटजी भटजी यांच्या मोहजाळात फसुन मागासवर्गीय हिंदु म्हणजे ओबीसी, एस सी, एस टी,भटके हे त्यांच्या भावी पिढ्यांना शिक्षण बंदी, रोजगार बंदी,हक्क अधिकार बंदी. गुलाम बनवून हिंदु राष्ट्राच्या भ्रामक कल्पनेने नरक यातना भोगायला लावणाऱ्या परिस्थितीत ढकलत आहेत. महात्मा फुलेंनी सांगितले आहे.ब्राम्हण तुमच्यावर राज्य करतो.कारण तुमच्या अज्ञानामुळे.

मती विना निती गेली!
निती विना गती गेली!
गती विना वित्त गेले!
वित्ता विना शुद्र खचले!
एवढा अनर्थ एका
अविद्येने केला.

हा ओबीसी समाजातील महात्मा ज्योतीबा फुलेनी दिलेला क्रांतिकारी संदेश महारांचे बौद्ध झालेल्या लोकांनी स्वीकारला म्हणूनच आज ब्राह्मणांच्या बरोबरीने शिक्षणात बौद्धांचे प्रमाण आहे,हे ओबीसीनां दिसत नाही.सरकारी नोकरीत ब्राह्मणांच्या वरचढ अधिकारी बौद्ध समाजातील आहेत. पण धर्मसत्ता,राजसत्ता ब्राह्मणांच्या नियंत्रणा खाली असल्यामुळे सरकार कोणाचे ही असो शासन प्रशासनावर ब्राह्मणांची पकड मजबूत आहे.त्यांचे नेतृत्व भारतीय मजदूर संघ ही मनुवादी विचारांची राष्ट्रीय ट्रेंड युनियन करते,ती आर एस एस प्रणित असल्यामुळे या कानाचे खबर त्या कानाला होत नाही. हेच ओबीसी नां माहिती नाही. मान्यवर कांशीराम यांनी जिसकी संख्या भारी उतनी उसकी भागेदारी हे सांगुन त्यांच्या या धर्मसत्ता राजसत्तेचा सुरुंग लावला होता. त्यामुळेच उत्तर भारतात ओबीसी मुलायम सिंग यादव,लालूप्रसाद यादव यांनी ओबीसी ला न्याय मिळवून देण्यासाठी मंडल आयोगाची जनजागृती केली होती.त्याला लालकृष्ण अडवाणी यांनी रामाचे कमंडल बाहेर काढून राम मंदिर रथ यात्रा काढली त्यात सर्वात जास्त ओबीसी सहभागी झाले होते.हा इतिहास ओबीसी कार्यकर्ते नेते समाजाला सांगत नाही. म्हणूनच त्यांना बौद्ध, मुस्लीम आरक्षणा मुळे ओबीसी वर अन्याय होतो हे सांगितले जाते.आणि ओबीसी स्वताला हिंदू म्हणून घेतो आणि यामुळेच आपली दिशाभूल होते.



ओबीसी सुतार समाजात अनेक सामाजिक संघटना आणि सामाजिक संस्था कार्यरत आहेत आणि त्यांचा विस्त–ार हा राज्यभरात तालुका पातळी ते जिल्हा पातळी ते थेट राज्यस्तरीय विस्तारित आहे याची मला थोडीफार सुतार कल्पना आहे. ओबीसी सुतार समाजातील ओबीसी सुत–ार समाज नेत्यांनी एक आवाहन केले तर समाज नेत्यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी,आरक्षण,संविधान,जनगणना बद्दल समाज जागृती मेळाव्यात तसेच वैचारिक मेळाव्यात,आंदोलनात, मोर्चात,राजकीय हिस्सेदारी साठी हक्काच्या लढाईत राज्यातील ओबीसी सुतार समाज बांधवांचा प्रचंड असा हजारोंच्या,लाखोंच्या संख्येने प्रतिसाद नक्कीच मिळणार याची मला खात्री आहे म्हणूनच लिहतो ओबीसी सुतार बांधवांनो प्रथम संघ शक्ती निर्माण करा संपुर्ण समाज एकसंघ एका छताखाली एकजुटीने एकत्रित येण्यासाठी प्रयत्न करा यालाच ओबीसी सुतार समाजात संघ शक्ती निर्माण करणे म्हणता येईल.

ओबीसी सुतार समाज नेत्यांनी ओबीसी सुतार समाजात ओबीसी जागरुकता अभियान राबविणे गरजेचे आहे असे मला वाटते त्यासाठी सर्वांनी निस्वार्थ निपरपेक्षपणे सहकार्य,करावे. हीच अपेक्षा.आपल्या कार्यकर्त्यांचे नेत्यांनी जरुर ऐकावे परंतु,एखाद्या वेळी नेत्याचा दांभिकपणा उघड होण्याची शक्यता नाकारता येणार नाही त्यासाठी आवश्यक असते नैतिकतेचे व वैचारिकतेचे पालन करणे.जो स्वतः खोटं आभासी प्रयोग स्वीकारेल त्याचा आदर्श तसाच निर्माण होईल व खोट्याचा आभासी परिणाम होईल. सत्य स्वीकारा,समाजाने जनतेने सुद्धा चिकित्सा व समीक्षा करावी.डोळे बंद करून मेंढरा सारखे एकामागे एक पळू नये. आपली स्वतःची आणि इतरांची सुद्धा दिशाभूल टाळा. त्यासाठी ओबीसी सुतार बांधवांनो प्रथम संघ शक्ती निर्माण करा संपुर्ण ओबीसी सुतार समाज एकत्रित येण्यासाठी एकसंघ एका छताखाली येण्यासाठी बांधवांनो प्रयत्न करा प्रथम संघ शक्ती निर्माण करा.

जय संत भोजलिंग,जय ओबीसी,जय संविधान.

प्रमोद सुर्यवंशी–८६०५५६९५२१,चिखली बुलडाणा

# नव प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ




मुरुड/ महेंद्र आल्टे : संभाजी महाविद्यालय मुरुड लोकप्रशासन व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने २०२३ – २४ मध्ये प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ दिनांक १४ सप्टेंबर २०२३ रोजी संपन्न झाला. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. पिडगे ए. के., महाविद्यालयातील आयक्यूएसी समन्वयक प्रा. गायकवाड एम. बी. यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाला. यावेळी लोकप्रशासन व राज्यशास्त्र विषयातील नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून आयक्यूसी समन्वयक प्रा. एम. बी. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. तसेच अध्यक्षीय समारोप प्र. प्राचार्य डॉ.पिडगे ए.के. यांनी विद्यार्थ्यांना भावी जीवनाच्या शुभेच्छा देऊन सांगता केली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. डॉ. चावरे एम. व्ही. यांनी केले तर आभार प्रा. पैठणकर एन.एल. यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.चव्हाण डी. आर., प्रा.दत्ता पवार यांनी विशेष परिश्रम घेतले या कार्यक्रमास लोकप्रशासन व राज्यशास्त्र विषयाचे विद्यार्थी– विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकरी आणि साहित्यिक दोघही व्यवस्थेचे शिकार – भारत सातपुते

अहमदपूर /राठोड रमेश :– भारतीय शेतकरी आणि इथला साहित्यिक हे दोघेही व्यवस्थेचे शिकार होत असून शेतकऱ्यांना व्यापारी लुटतात आणि साहित्यिकांना प्रकाशक लुटतात दोघेही इथल्या व्यवस्थेचे शिकार झा–लेले आहेत असे उद्गार ज्येष्ठ साहित्यिक आणि सुप्रसिद्ध कवी भारत सातपुते यांनी अहमदपूर येथे घेण्यात आलेल्या गारपीट आणि कविता पावसाच्या या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन प्रसंगी काढले. त्यांनी पुढे सांगितले की इथला शेतकरी हा निसर्गाच्या लहरीपणाच्या दुष्टचक्रात अडकलेला आहे पाऊस पडला नाही तर तो कोरड्या दुष्काळात भाजून निघतो आणि अतिवृष्टी झाली तर तो ओल्या दुष्काळात कुजून निघतो या दोन्ही प्रसंगी शेतकरी हा संकटात सापडतो. एवढं संकट झेलूनही थोडं फार जर शेतात पिकलं तर व्यापारी मात्र त्याचं धान्य बे भाव किमतीत खरेदी करतात आणि अशा परिस्थितीमध्ये तो कायमचा कर्जाच्या ओझ्यात राहतो. आपल्या पाल्याला चांगले शिक्षण देण्याचं आणि आपल्या घरामध्ये चांगल्या सुख सुविधा निर्माण करण्याचं स्वप्न त्यांचं कधीच पूर्ण होत नाही आणि नेमकी अशीच परिस्थिती साहित्यिकांबाबत सुद्धा आहे. लेखक आणि कवी आपले पुस्तक लिहितात आणि ते घेऊन संपादकाकडे जातात आणि संपादक मात्र छपाई मूल्य म्हणून त्या कवी आणि लेखकाकडून चौपट किंमत वसूल करतात आणि त्या साहित्यिकाची उमेद तिथेच संपवितात असे दुःख त्यांनी व्यक्त केले. भारताचे महान राजे अशोक यांच्या २३ व्या जन्मशताब्दी समारोह वर्षाच्या प्रसंगी सामाजिक मती समृद्धता आंदोलन अंतर्गत पुरोगामी साहित्य परिषद आणि पे बॅक टू सोसायटी प्रोग्राम महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने काव्यसंग्रहाचे प्रकाशन आणि कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आ–लेले होते या प्रकाशन समारंभाचे आणि कवी संमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक प्राध्यापक ज्ञानेश्वर गायकवाड हे होते आणि प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ विद्रोही साहित्यिक अंकुश सिंदगीकर ज्येष्ठ साहित्यिक वायडी वाघमारे, सु–नील खंडाळीकर पत्रकार बाबासाहेब वाघमारे हे होते. पुस्तक प्रकाशन आणि कवी समीरलाच्या उद्घाटन प्रसंगी भारत सातपुते यांनी सांगितले की खऱ्या साहित्यिकांची अवहेलना होत असून नकली साहित्यिकांचे सरकारी दरबारी सुळसुळाट झालेला असला तरी समाजाला योग्य दिशा दाखवण्याचं कार्य हा साहित्यिकच करत असतो आणि साहित्यामुळेच देशाची आणि समाजाची प्रगती होत असते म्हणून साहित्यिकांनी खचून न जाता जोमाने आपले लिखाण कार्य चालू ठेवावे. याप्रसंगी विद्रोही साहित्यिक अंकुशिंगीकर, वाय डी वाघमारे, सुनील खंडाळीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले प्रकाशन समारंभा नंतर प्राध्यापक भगवान रामलापुरे लिखित कवितासंग्रह गारपीट आणि विजय पवार संपादित कवितासंग्रह




कविता पावसाच्या या काव्यसंग्रहातील कविता वर बहारदार कवी संमेलन झाले त्या कवी संमेलनामध्ये किरण गोंडगे निलंगा बालिका बरगळ नांदेड बालासाहेब पांचाळ वसमत मदन अंभोरे वसमत सय्यद चांद तरोडकर वसमत लक्ष्मण सूत मालेगाव नांदेड वैजनाथ कांबळे हाडोळती शिवा कराड रंजना गायकवाड प्राध्यापक भगवान अमलापुरे कंधार गणेश चव्हाण सांगवी विजय पवार लोहा मुरारी कराड पार वर्षा माळी शिवकांता शिंदे लातूर प्राध्यापक संजीव कुमार भोसले यांनी आपल्या बहारदार कविता सादर करून श्रोत्यांची मने जिंकली. प्रारंभी पुरोगामी साहित्य परिषदेचे सचिव आणि पे बॅक टू सोसायटी प्रोग्रामचे राज्य कन्वेनर एन डी राठोड यांनी पुस्तक प्रकाशन आणि कवी संमेलन याची प्रस्तावना सादर केली. या दोन्ही कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध कवी साहित्यिक आर के गजलवार यांनी केले तर या दोन्ही कार्यक्रमाचे आभार कवी मुरहरी पारकर यांनी मानले.

# भारत बौद्धमय करण्याच्या प्रक्रियेमध्ये भन्ते अश्वजीत यांचे भरीव योगदान ; पी. जे. वानखडे




बाळापूर/प्रतिनिधी– संपूर्ण भारत बौद्धमय करण्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अधूरे स्वप्न पूर्ण करण्याची प्रत्येक बौद्ध, आंबेडकरी अनुयायाची जबाबदारी आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी आ–ळखून चळवळीला बळकटी देण्यासाठी आपापल्या परिने प्रयत्न करणे गरजेचे आहे. बौद्धमय भारत करण्याच्या प्रक्रियेमध्ये भन्ते अश्वजीत यांनी भरीव योगदान देत सामाजिक परिवर्तनाला सुरूवात केली, असे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे अकोला जिल्हाध्यक्ष पी. जे. वानखडे यांनी केले. ते पू. भंदत अश्वजीत थेरो यांच्या प्रथम स्मती दिनानिमित्त (दि. ११ सप्टेंबर) स्थानिक त्रिमूर्ती बुद्ध विहार नवानगर येथे आयोजित कार्यक्रमातुन बोलंत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पू भदंत अश्वजीत थेरो स्मती धम्मसंस्कार वर्गाचे प्रशिक्षक पू भदंत धम्मशरण महास्थवीर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन पू भदंत विनयपाल महास्थवीर, पू आर्याजी धम्मशीला, पू भन्ते रठ्ठपाल, भंन्ते अमरज्योती, आर्याजी सुमती, आर्याजी गौतमी, डी बी शेगांवकर, गवई गुरूजी, मेश्राम गुरूजी आदी उपस्थीत होते. कार्यक्रमाची सुरूवात बुद्ध वंदनेने झाली. त्यानंतर भिक्खू संघाने उपस्थितांना उपदेशीत केले. अध्यक्षीय समारोप करतांना भ. धम्मशरण म्हणा–ले की, भन्ते अश्वजीत यांच्या संकल्पनेतील धम्मसंस्कार वर्ग अविरत सुरू ठेवण्याचा आमचा प्रयत्न असून आजघडीला अकोला, बुलढाणा आणि वाशिम जिल्हयांमध्ये याची सुरूवात आम्ही केली आहे सुसंस्कत समाज घडविण्यासाठी बालक वर्ग, तरूणांना धम्मसंस्कार देण्याची गरज आहे असे ते यावेळी म्हणाले कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा विश्वजीत वानखडे यांनी केले. सूसंचालन अमरदीप वानखडे यांनी तर आभार अंकुश उमाळे यांनी मानले. यावेळी धम्मसंस्कार स्मारक समितीच्या वतीने आयोजित विविध स्पर्धांचे बक्षिस वितरण करण्यात आले.

# कंत्राटी नोकर भरती थांबवा – प्रा.डॉ.संजय शिंदे

औरंगाबाद (प्रतिनिधी) महाराष्ट्र शासनाने बाह्य यंत्रणेकडून कामं करून घेण्यासाठी दिनांक ६ सप्टेंबर २०२३ रोजी सेवा पुरवठादार एजन्सी नेमण्याचा निर्णय घेतला असून हा निर्णय महाराष्ट्रातील एस.सी.एस.टी.ओबीसी , अल्पसंख्याक यांच्यावर अन्याय करणारा आहे त्यामुळे तो तात्काळ मागे घ्यावा अशी मागणी फकिरा ब्रिग्रेडचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ.संजय शिंदे यांनी मुख्यमंत्री यांना निवेदनाव्दारे केली आहे.

सरकारच्या विविध विभागांमध्ये लाखोंचा अनुशेष शिल्लक असताना तो न भरता आपल्या बगलबच्च्याच्या एजन्सीला कामे देऊन शासन आरक्षण धोरण मोडीत काढून सुशिक्षित बेरोजगारांचे जीवन उद्ध्वस्त करीत आहे.

सध्या महाराष्ट्रात प्रचंड बेकारी वाढली असून बेकारांचे तांडेच्या तांडे फिरत आहेत याचा विचार शासनाने केला पाहिजे ज्या एजन्सीला भरतीचे कामं दिली आहेत ते आपल्या मर्जीतील लोकांना नोकरीला घेतील त्यांना घटनेने दिलेले आर–क्षण पाळण्याचे बंधन असणार नाही,या सेवेला कुठलेही संरक्षण असणार नाही सातव्या वेतन आयोगाप्रमाणे देत असलेल्या एकूण वेतनाच्या पन्नास टक्के वेतन सदर कर्मचाऱ्यांना मिळणार आहे तसेच या कार्मचा–यांना पाच वर्षे वार्षिक वेतनवाढ मिळणार नाही हा कर्मचाऱ्यांवर अन्याय आहे.त्यामुळे शासनाने काढलेला जी.आर. रद् करावा अन्यथा या धोरणाच्या विरोधात महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये फकिरा ब्रिगेडच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी

# लातूरच्या हक्काच्या पाण्यासाठी जनरेट्याची गरज– माजीमंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर

## जनजागर मंचच्या बैठकीत एकत्रीत लढा उभारण्याचे केले आवाहन




लातूर/प्रतिनिधीः– लातूर जिल्ह्याचा पाणी प्रश्न अतिशय जटील असून लातूरला हक्काचे पाणी मिळावे याकरीता योग्य पर्याय आवश्यक आहे. त्याचबरोबर जिल्ह्यातील सध्याची व भविष्यातील पाण्याची स्थिती काय असेल याबाबत लोकांमध्ये जागृती आवश्यक आहे. या बाबीचा विचार करूनच जनजागर मंचच्या वतीने पाणी, शिक्षण आणि रोजगार हे तिन विषय घेऊन लढा उभा करण्याचा निर्धार केला आहे. लातूरला हक्काचे पाणी मिळावे याकरीता जलसाक्षरता रॅली काढण्यात येत असून या रॅलीच्या माध्यमातून जनजागृती करून आवश्यक असलेल्या जनरेट्यासाठी पाठिंबा मिळविण्यात येणार आहे. त्याचबरोबर लातूरला हक्काचे पाणी मिळावे याकरीता जनरेट्यासोबतच एकत्रीत लढा उभा करण्याची गरज असल्याचे सांगून याकरीता सर्वपक्षीय लोकप्रतिनिधीसह, गणेशमंडळ व सामाजिक संघटनाच्या पदाधिकार्यांनी एकत्रीत यावे असे आवाहन माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केले आहे.

लातूर येथील राधिका कन्व्हेंशन सेंटरमध्ये जनजागर मंचच्या वतीने गणेशोत्सवा दरम्यान काढण्यात येणार्या जलसाक्षरता रॅलीची माहिती देण्यासाठी व यामध्ये सहभागी होण्याकरीता घेण्यात आलेल्या सर्वपक्षीय व गणेश मंडळ आणि सामाजिक संघटनेंच्या पदाधिकारी बैठकीमध्ये माजीमंत्री आ. निलंगेकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर औश्याचे माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे डॉ. अफसर शेख, शैलेश गोजमगुंडे, मनसेचे शिवकुमार नगराळे, लातूर शहर भाजपा जिल्हाध्यक्ष देविदास काळे, गुरुनाथ मगे, औश्याचे माजी नगराध्यक्ष किरण उटगे, जि.प.चे माजी अध्यक्ष मिलिंद लातूरे, शिवकुमार चिंचनसुरे, नरसिंग बिराजदार, निळकंठ मिरकले, महेश कौळखेरे, देवा गडदे, वैशाली यादव, गणेश गोमसाळे, निखील गायकवाड आदींची उपस्थिती होती.

राजकीय क्षेत्रात काम करीत असताना सामाजिक बांधीलकी जोपासणेही तितकेच गरजेचे असल्याचे सांगून माजी मंत्री आ.निलंगेकर म्हणाले की, लातूर जिल्हयाला हक्काचे पाणी मिळाले तर त्यातून रोजगार निर्माण होईल आणि विकासालाही अधिक चालना मिळेल. मात्र लातूरला ज्या–ज्या वेळी हक्काचे पाणी मिळावे यासाठी चर्चा होती. त्या–त्या वेळी उजनीच्या पाण्याचा पर्याय सुचविला जातो. मात्र उजनीचे पाणी खरेच मिळणार का? असा प्रश्न उपस्थित करून उजन–ीचे पाणी लातूरला मिळावे याकरीता कोणताही प्रस्ताव अथवा कागद अद्यापही शासन दरबारी नसल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. त्यामुळेच आता सरकारने मराठवाड्याला वाहून जाणारे पाणी देण्याचा जो निर्णय घेतला आहे त्याबाबत योग्य माहिती लोकांपर्यंत पोहचवून लातूरला हक्काचे पाणी कसे मिळेल याकरीता शासनाकडे पर्यायही उपलब्ध करून देण्याचे नियोजन जनजागर मंचच्या वतीने करण्यात येत असल्याचे सांगितले. जनजागर मंच हे अराजकीय व्यासपीठ असून केवळ आणि केवळ लातूरच्या हक्काच्या पाण्यासाठी या मंचच्या माध्यमातून शासनदरबारी पाठपुरावा आणि जनतेमध्ये याबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याचे सांगून माजीमंत्री आ. निलंगेकर म्हणाले की याकरीता सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी, पदाधिकारी यांच्यासह गणेश मंडळ व सामाजिक संघटनेचे पदाधिकारी यांनी एकत्रीत येऊन जलसाक्षरता रॅलीत सहभागी होण्याची अपेक्षा व्यक्त केली.

गणेशोत्सवा दरम्यान लातूर जिल्ह्यात ही जलसाक्षरता रॅली काढण्यात येणार असून लातूरच्या हक्काच्या पाण्यासाठी गणेश मंडळांसह सर्वपक्षांचा पाठिंबा मिळवण्यासाठी या रॅलीच्या माध्यमातून संवाद साधण्यात येणार असल्याचे आ.निलंगेकर म्हणाले. या पाठिंब्याच्या माध्यमातून जनरेटा तयार करून शासन दरबारापर्यंत या जनरेट्याचा आवाज पोहचविण्यासाठी सर्वांनी एकत्रीत येऊन जनआंदोलन उभे करणे आवश्यक आहे. त्यामुळेच लातूरचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी सोडवीण्यासह रोजगारांच्या संधी आणि केंद्रीय विद्यापीठ, एम्स व आयआयटी सारख्या विद्यापिठांची मागणी पुर्ण करून घेण्यासाठी जिल्हाभरात जनआंदोलन उभे करण्यासाठी सर्वांनी एकत्रीत यावे असे आवाहन माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी यावेळी केले.

या बैठकींमध्ये डॉ.अफसर शेख, शिवकुमार नगराळे, देविदास काळे यांच्यासह डॉ. पवन लड्डा आदींनी आपले मनोगत व्यक्त करून लातूरच्या हक्काच्या पाण्यासाठी आम्ही एकत्रीत येऊन लढा उभा करू असाविश्वास यावेळी व्यक्त केला. बैठकीचे प्रास्ताविक ॲड. शैलेश गोजमगुंडे तर सुत्रसंचलन सुरेश जाधव यांनी केले. या बैठकीची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# आयुष्मान भव: मोहिमेचा शुभारंभ आयुष्मान भव: मोहिमेअंतर्गत हेल्थ कार्ड (आभा कार्ड) काढून घेणे

लातूर :– दि. १३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत आयुष्मान भव: ही मोहीम विवीध उपक्रमाद्वारे राबविणेबाबत शासनाच्या सूचना आहेत. काल दि.१३.०९.२०२३ रोजी मनपाच्या सर्व प्रा.ना. आ.केंद्र येथे अवयवादानाची प्रतिज्ञा घेवून व एकूण २८३ नागरिकांचे हेल्थ कार्ड (आभा खऊ) तयार करून आयुष्मान भव: या योजनेचा शुभारंभ करण्यात आला.

या मोहिमेदरम्यान आयुष्मान आपल्या दारी ३.० या उपक्रमाअंतर्गत आरोग्य कर्मचारी व आशा स्वयंसेविका यांचेमार्फत गृहभेटी देवून नागरिकांचे हेल्थ कार्ड (आभा खऊ) काढण्यात येणार आहे. तसेच मार्गदर्शक सूचनास अनुसरून दि.०२.१०.२०२३ पर्यंत दर शनिवारी मनपाच्या प्रत्येक प्राथमिक नागरिक आरोग्य केंद्र / आरोग्यवर्धिनी केंद्र येथे आरोग्य शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. तसेच गणेश मंडळांना रक्तदान शिबीर आयोजित करणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

आयुष्मान भारत डिजिटल मिशन अंतर्गत प्रत्येक नागरिकाला हेल्थ कार्ड (आभा खऊ) देण्यात येत आहे. रुग्णाच्या नोंदणीपासून ते तपासणी, लॅब रिपोर्ट,उपचार, ब्लड ग्रुप इ. आरोग्यविषयक सर्व रेकॉर्ड या डिजिटल माध्यमातून संग्रहित करून ठेवता येणार आहे. त्यामुळे भविष्यात डॉक्टरांकडे जाताना जुने रेकॉर्ड ठेवण्याची गरज राहणार नाही किंवा दाखवण्याची गरज लागणार नाहीए. हेल्थ कार्ड काढण्यासाठी फक्त आधार कार्ड आपल्या मोबाईल क्रमांकाला लिंक असणे आवश्यक आहे.

तरी शहरातील सर्व नागरिकांनी आपले व आपल्या पाल्याचे (५ वर्षावरील) हेल्थ कार्ड नजिकच्या प्राथमिक नागरी आरोग्य केंद्र / आरोग्यवर्धिनी केंद्र येथे जावून किंवा स्वतः मोबाईल वरती –इक– खऊ वेबसाईटवर जावून तयार करून घ्यावे असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# वसमत तालुक्यातील लिंगी येथे भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने सभासद नोंदणी कार्यक्रम



लिंगी :– वसमत तालुक्यातील लिंगी येथे भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने सभासद नोंदणी कार्यक्रम. लिंगी येथे सभासद नोंदणी अभियान अंतर्गत सभासद नोंदणी कार्यक्रम घेण्यात आला.तालुका अध्यक्ष बालाजी मोरे, शहर अध्यक्ष मेजर भगव–ानराव सुर्यतळ, उपाध्यक्ष दौलतराव गजभार , उपाध्यक्ष रघुपती सरोदे, सचिव साहेबराव सरोदे, बार्टीचे समतादुत मिलिंद आळणे यांनी बार्टी योजनाची प्रबोधन केले. जेष्ठ उपासक देविदासराव शिवभगत उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रावसाहेब कुरवाडे होते.प्रास्ताविक व सुत्रसंचलन देविदासराव शिवभगत यांनी केले.आभार भगवान शिवभगत यांनी मानले.कार्यक्रम यशस्वितेसाठी पंडित शिवभगत व गावातील बौद्ध उपासक उपासिका यांनी प्रयत्न केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE